नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/१०/२०२६ (रविवार)

१८ वर्षापासुन पाहिजे आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पोलीस स्टेशन बेला येथे दाखल असलेल्या अप. क्र. ३०१३/२०१३ कलम २२४ भादंवि या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी दिलीप गुलाबराव हटवार, वय ४६ वर्षे, रा. मोहगाव, ता. नागपूर हा मध्यवर्ती कारागृह नागपूर येथून मागील १८ वर्षांपासून पासून फरार आरोपीचा या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद पाहीजे आरोपीचा शोध घेतला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी दिलीप गुलाबराव हटवार, वय ४६ वर्षे, रा. मोहगाव, ता. नागपूर याचा शोध घेवुन त्यास **Minex Metallurgical Co. Ltd.** निमजी कळमेश्वर येथून ताब्यात घेतले. आरोपी मिळून आल्यानंतर त्यास पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन बेला यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर आरोपीस पो.स्टे. बेला येथील अप. क्र. ५६/९८ कलम ३०२, ३४ भादंवि. मध्ये मा. सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून सदर आरोपी हा मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे बंदी होता. यादरम्यान सदर आरोपी वर्ष २००८ मध्ये पॅरोल रजेवर सुटला असताना तो रजा पूर्ण झाल्यावर परत जेलमध्ये हजर झाला नाही तो मागील १८ वर्षांपासून फरार होता.

पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीस अटक बोरी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी:– दिनांक २४/१०/२०२६ रोजी फिर्यादी सौ. उर्मिला रमेष कुडमते, वय ४६ वर्ष, रा. जुनीवस्ती, वार्ड क्र. १, बौध्द विहार बुट्टीबोरी, ता. जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन बोरी येथे तक्रार दिली की, फिर्यादीचा मुलगा मृतक नामे तुषार रमेश कुडमते, वय २७ वर्षे याचे सिजराईल नावाच्या मुलीसोबत प्रेमसंबंध होते. त्यानंतर दोघांनी मंदिरात विवाह केला होता. विवाहानंतर काही दिवसांनी सिजराईल हिची अजय सिरसाम याच्यासोबत ओळख झाली. दिनांक २३/१०/२०२६ रोजी मौजा हनुमान नगर बुट्टीबोरी येथे सिजराईल हिने ''मी अजय सिरसाम याचेसोबत जाते'' म्हणुन तुशारला सांगितले असता तुशार याने सिजराइलला अजय सिरसाम याचे सोबत जाण्यास मनाई केली. या कारणावरून आरोपीने तुषार याच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार करून जिवानिशी ठार केले.

पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०३(१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून आरोपी अजय बिमानसिंग सिरसाम, वय २५ वर्षे, रा. खापरी (मोरेश्वर) ता. हिंगणा, जि. नागपूर याला दिनांक २४/१०/२०२६ रोजी गुन्हा दाखल झाल्यापासुन २४ तासाचे आत अटक करण्यात आली आहे.

अवैध जुगार खेळणाऱ्यांवर ०५ गुन्हे नोंद.

दिनांक २४/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या तसेच सट्टापट्टीचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २६०५/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन मध्ये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत आरोपी नामे सर्वेश बंडुजी बोरकर, वय ३० वर्षे, राह. वार्ड क्र. ०२ आष्टीकला कळंबी ता. कळमेश्वर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** आरोपी नामे १) राजेन्द्र विठ्ठलराव नारनवरे, वय ३८ वर्ष, २) बळीराम रामभाउ सहारे, वय ३० वर्ष, रा. मालापुर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण ०२ आरोपींविरूद्ध ०१ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच आरोपी १) आकाश राजु गुरमुळे, वय २० वर्ष, २) गौरव अनेता चव्हान, वय २७ वर्ष ३) ईरशाद अकबर शेख, वय २८ वर्ष ४) ईसम छोटु उर्फ राशिद

गफ्फार, वय २९ वर्ष, पाचही रा. इंदिरा नगर नरखेड ५) ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण ०४ आरोपींविरूद्ध व ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेवर ०१ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** आरोपी नामे जिवन विठ्ठलराव चापले, वय ५१ वर्षे, रा. लोहारी सांवंगा ता. नरखेड हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत** आरोपी नामे शशिंनद भारत गेडाम, वय ३८ वर्ष, रा. राजगुडा, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया, ह. मु. टेंभरी नंद पाटील यांच्या घरी किरायाने ता. हिंगणा, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद,

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन, वाहतूक करणाऱ्यांवर २१ गुन्हे दाखल,

दिनांक २४/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन, वाहतूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २१ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण ९७२० मिली देशी दारू, ५८ लीटर मोहाफुल दारू, ०१ मोसा असा एकुण २५,२४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर